राष्ट्रोध्दाराय तंत्र शिक्षणम्
दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४
Email ID: ropune@dtemaharashtra.gov.in

महाराष्ट्र शासन

# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय,पुणे

४१२, ई, शिवाजीनगर, पुणे ४११ ०१६.

जा. क्र. : तंशिविकापु/आस्था-३(ब)/२०२०/ 1716 दिनांक : 05 JUN 2020

प्रति,

प्राचार्य / संचालक / उपसचिव,
पुणे विभागातील कार्यालयाचे अधिनस्त
सर्व शासकीय व अशासकीय अनुदानित संस्था / कार्यालय.

**विषय : मर्यादित उपस्थितीच्या काळात शासकीय कार्यालयातील कर्मचा-यांच्या उपस्थिती सुनिश्चित करणे व वेतन आहरित करण्याबाबतच्या सूचना.**

संदर्भ : महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण १०२०२०/प्र.क्र.०१/सचिव (व्यय), दिनांक ०५/०६/२०२०.

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने कोव्हिड-१९ चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी जारी केलेल्या लॉकडाऊन काळात राज्य शासकीय कर्मचा-यांची कार्यालयीन उपस्थिती मर्यादित ठेवण्याबाबत वेळोवेळी शासनाकडून सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. तथापि विभागातील काही अधिकारी / कर्मचारी लॉकडाऊन कालावधी दरम्यान पूर्व परवानगी शिवाय गैरहजर आहेत, तसेच मुख्यालय सोडून अन्य गांवी गेले आहेत, त्या अनुषंगाने शासकीय कर्मचा-यांनी कामाप्रती सर्वतोपरी निष्ठा ठेवणे अनिवार्य असून कार्यालयातील कामाचे कर्मचारी निहाय समन्यायी वाटप होणेही आवश्यक असल्याने जे अधिकारी / कर्मचारी त्यांना नेमून दिलेल्या उपस्थिती च्या दिनांकास कार्यालयात अनुपस्थित राहतील अशा कर्मचा-यांच्या संदर्भात कोणती कार्यवाही करावी याबाबतच्या स्पष्ट सूचना संदर्भित परिपत्राकान्वये दिलेल्या आहेत. (सोबत प्रत जोडण्यात येत आहे)

तरी या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त सर्वशासकीय व अशासकीय अनुदानित संस्था / कार्यालयांनी सदर परिपत्रकातील निर्देश व मार्गदर्शक सूचनांनुसार उचित कार्यवाही करावी. प्रस्तुत प्रकरणी लॉकडाऊनच्या कालावधीत कार्यालयीन उपस्थितीबाबत आपल्या संस्थेने निर्गमित केलेल्या आदेशांच्या प्रती या कार्यालयास त्वरित सादर कराव्यात.

(डॉ. दि. रा. नंदनवार).
प्र. सहसंचालक,
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.

प्रत : माहिती व पुढील कार्यवाहीकरिता रवाना :-
(१) मा. संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई ४०० ००१ यांना माहितीस्वत सविनय सादर.
(२) ह्या कार्यालयातील प्रोग्रॅमर यांना सदरचे पत्र या कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रदर्शित करणेसाठी.

मर्यादित उपस्थितीच्या काळात शासकीय
कार्यालयातील कर्मचाऱ्यांच्या
उपस्थिती सुनिश्चित करणे व वेतन
आहरित करण्याबाबत सूचना

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०००३२
शासन परिपत्रक क्र. संकीर्ण १०२०२०/ प्र. क्र. ०१ / सचिव (व्यय)
दिनांक : ५ जून, २०२०

परिपत्रक-

कोव्हिड-१९ चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी जारी केलेल्या लॉकडाऊन काळात राज्यशासकीय कर्मचाऱ्यांची कार्यालयीन उपस्थिती मर्यादित ठेवण्याबाबत वेळोवेळी शासनाकडून सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. त्यानुसार मर्यादित संख्येत अधिकारी व कर्मचारी यांच्या उपस्थितीत मंत्रालयीन विभाग व क्षेत्रीय कार्यालयातील कामकाज सुरू आहे. तथापि, असे निदर्शनास आले आहे की, विभागातील काही अधिकारी/कर्मचारी लॉकडाऊन कालावधी दरम्यान पूर्व परवानगी शिवाय गैरहजर आहेत तसेच मुख्यालय सोडून अन्य गावी गेले आहेत त्यामुळे कार्यालयात उपस्थित राहणाऱ्या कर्मचाऱ्यांवर अतिरिक्त कामाचा अनाठायी ताण येत आहे.

शासकीय कर्मचाऱ्यांनी शासकीय कामाप्रती सर्वतोपरी निष्ठा ठेवणे अनिवार्य आहे तसेच कार्यालयातील कामाचे कर्मचारी निहाय समन्यायी वाटप होणेही आवश्यक आहे. त्या अनुषंगाने खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

१. प्रत्येक विभागानी आपले अधिनस्त सर्व कर्मचारी/ अधिकारी बाबत रोस्टर तयार करावे ज्यामध्ये प्रत्येक कर्मचारी / अधिकारी आठवडयात किमान एक दिवस कार्यालयात हजर राहतील. पूर्वमंजूर अर्जित व तत्सम तसेच वैद्यकीय कारणास्तव रजेवर असलेल्या कर्मचाऱ्यांव्यतिरिक्त सर्व कर्माचाऱ्यांपैकी प्रत्येक कर्मचाऱ्याला आठवड्यातून किमान एक दिवस कार्यालयात हजर राहणे अनिवार्य राहिल. सदर कर्मचाऱ्याने उपस्थित रहावयाच्या दिनांकाबाबत विभागप्रमुख, आस्थापनाशाखा यांनी आदेश काढावेत.
२. सर्व अधिकारी / कर्मचारी यांना त्यांना नेमून दिलेल्या उपस्थिती च्या दिनांकास कार्यालयात उपस्थित राहणे अनिवार्य आहे. लॉकडाऊन च्या कालावधीत जे अधिकारी / कर्मचारी यांनी विनापरवानगी



Scanned wit

मुख्यालय सोडले आहे त्यांच्या विरुद्ध म.ना.से.(वर्तणूक )नियम १९७९ अंतर्गत शिस्तभंगाची कारवाई करण्याबाबत सर्व प्रशासकीय विभाग यांनी कार्यवाही करावी.

३. निर्देशित दिनांकांना सदर कर्मचारी अनुपस्थित राहिल्यास सदर कर्मचाऱ्याची त्या आठवड्याची अनुपस्थिती देय व अनुज्ञेय अर्जित वा यथास्थिती विनावेतन रजा म्हणून नियमित करण्यात यावी.

४. आठवड्यात एकापेक्षा अधिक दिवशी कर्मचाऱ्याला हजर राहण्याबाबत आदेशित करण्यात आले असेल तर त्यापैकी जे दिवस सदर कर्मचारी उपस्थित असेल ते वगळून त्या आठवडयातील अन्य दिवसांची अनुपस्थिती देय व अनुज्ञेय अर्जित वा यथास्थिती विनावेतन रजा म्हणून नियमित करण्यात यावी. .

५. आहरण व संवितरण अधिकारी यांनी कर्मचाऱ्यांची उपस्थिती विचारात घेऊनच वेतन देयके आहरित करावीत व देयकासोबत "शासन परिपत्रक क्र. संकीर्ण १०२०२० / प्र.क्र. ०१ / सचिव (व्यय), दिनांक ५ जून, २०२० मधील सूचना विचारात घेऊन केवळ उपस्थिती कालावधीचेच वेतन आहरित करण्यात आले आहे याची मी खात्री केली आहे" असे प्रमाणपत्र जोडावे त्याआधारे कोषागारांनी वेतन देयके पारीत करावीत.

६. सदर आदेश दि. ०८ जून, २०२० पासून आंमलात येतील. तसेच ते सर्व शासकीय कार्यालये व शासनाच्या अधिपत्याखालील महामंडळे, आस्थापना यांना लागू राहतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने.

(मनोज सौनिक) 5/6/2020
अपर मुख्य सचिव (वित्त)

प्रत माहितीसाठी
मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई-३२
प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी,
अ.मु.स./प्र.स./सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग,
त्यांना विनंती करण्यात येते की, सदर सूचना त्यांच्या अधिपत्याखालील क्षेत्रीय अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून त्यांचे काटेकोर पालन करण्याबाबत सूचना दयाव्यात.
संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय, मुंबई यांनी सदर सुचना सर्व कोषागारे तथा अधिदान व लेखाधिकारी यांच्या निदर्शनास आणाव्यात.



Scanned wit